भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)



वर्ष ११ वे | जुलै – सप्टेंबर २०१५ | अंक २ रा

अध्यक्षः श्री. आनंद पराडकर
मो.नं ९३२६८२६८८४

सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर
मो.नं ९८५०९७९७०६

कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी
मो.नं ९४४९०५१६५३

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. गणेश गुर्जर**
पुणे, ९८९०९९०११३
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे, ९९७०१७४८१८
**श्री. मकरंद फणसळकर**
पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**
श्री. दिलीप धोपेश्वरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२–२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदुर्ग, ९४२३८८०१३८

ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**– गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळा | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

**नियतकालिकाचे नाव :** भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता :** भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे – ४११ ०३०
**संपादक :** श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक :** एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


| | |
|---|---|
| ४ | बकुळफुले - ताकद |
| ५ | पर्यावरण |
| ७ | संस्थावृत्त - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड |
| ८ | तालचक्र म्युझिक ॲकॅडमीचे आगळेवेगळे उद्‌घाटन |
| ९ | व्यक्तीपरिचय - सदाशिव गोविंद कात्रे |
| ११ | हार्दिक अभिनंदन |
| १२ | Dr. Moonje's ideologies.......... : chief Minister |
| १३ | व्यक्तीपरिचय - श्री. अरुण निगुडकर |
| १४ | जंगली महाराजांच्या १२५ व्या पुण्यतिथीनिमित्त उपक्रम |
| १४ | संस्थावृत्त - फुलला स्वरमोगरा |
| १५ | धर्मवीर डॉ. बालकृष्ण शिवराम मुंजे की जीवन गाथा |
| २१ | पत्रप्रतिसाद, पाककृती |
| २२ | लोकशाही की हुकूमशाही |
| २३ | BrainCaliber |
| २५ | वासंतिक कीर्तन प्रशिक्षण शिबिरामध्ये चमकले बालकीर्तनकार |
| २६ | मराठीतील सदाबहार गीते |
| २७ | KARMA AND LIFE |
| २८ | आरोग्यदायी अन्न आणि ग्राहकांचे हक्क |
| 30 | सहल : एका आदिवासी विद्यार्थिनी वसतिगृहात |
| ३२ | कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे द्वारा राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिनाचे आयोजन |


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. **– संपादक**

# संपादकीय

— सस्नेह नमस्कार —

माागील अंकामध्ये मी मांडलेल्या विचारांवरून बेळगाव संघाने कन्नड भाषेमध्ये लेख पाठवला आणि त्याचा मराठी अनुवाद करून तो लेख/भाषण आपणासाठी 'संपर्क'मध्ये छापले. बेळगाव संघाचे विशेष अभिनंदन! भाषावार प्रांतरचना जरी असली तरीसुद्धा आपण या देशाचे नागरिक आहोत आणि प्रत्येक नागरिकाला आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे स्वाभाविक आहे. या द्विभाषिक लेखाची अनेकांनी प्रशंसा केली आणि तो 'संपर्क'मध्ये छापून आणल्याबद्दल सानंद समाधान व्यक्त केले. आता तर हिंदी, इंग्रजी आणि गुजराती भाषांमधून लेख येऊन आम्ही सारे एकच आहोत याची त्यांनी ग्वाही दिली आहे. हे तीन लेख पाठवणारे बंगलोर, ग्वाल्हेर, बडोदा संघाचे मी साभार अभिनंदन करतो. दि. ४ व ५ जुलै रोजी महासंघाची सर्वसाधारण सभा आहे. महासंघातर्फे आम्ही विशेष प्रयत्न केल्यामुळे विविध प्रदेशातील जास्तीत जास्त प्रतिनिधी उपस्थित राहतील, असा विश्वास आहे. बंगलोर, हुबळी या संघांनी प्रतिसाद दिला असून त्यांचे प्रतिनिधी सभेस येत आहेत. त्यामुळे महासंघाची ताकद निश्चितच वाढेल.

दि. २१ जून २०१५ हा एक महत्त्वाचा दिवस. मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या विशेष प्रयत्नातून हा दिवस 'योग दिन' म्हणून जगभर साजरा झाला. यामुळे भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे.

जून महिना म्हणजे 'नेमेचि' येणाऱ्या पावसाचा. सुरुवात तर चांगलीच आहे. वसुंधरा सुखावली आहे. शेतकरी बांधव खुशीत आहेत. मध्यंतरात उत्तम प्रकारे पाऊस होईल, असे अंदाज आहेत. तसेच होवो, ही ईश्वरचरणी प्रार्थना...

या अंकात 'संपर्क' वर्गणीबाबत एक निवेदन दिले आहे. कृपया याबाबत कोणीही गैरसमज करून घेऊ नये.

आपणा उभयतांमध्ये स्नेह आहेच... तो वृद्धिंगत व्हावा, ही सदिच्छा!

वर्षाऋतूच्या हार्दिक शुभेच्छा!

संपर्क



हितगुज

# ‘बकुळफुले’

**डॉ. श्रीकृष्ण जोशी**
रत्नागिरी

**राम गणेश गडकरी यांच्या भावबंधन नाटकात त्यांनी एक खूप चांगला विचार मांडलेला आहे. घनःश्याम हे त्या नाटकातील पात्र आहे. घनःश्याम लतिकेला म्हणतो, शब्द जिथून सुटतात तिथं काहीच खूण राहत नाही, पण ते जिथं लागतात तिथली जखम, कालांतराने बरी झाली तरी व्रण राहतोच. हे लागणं मानसिक असतं. संवेदनशील माणसाला वर्षानुवर्ष टोचणारं असतं. याचाच अर्थ वापरल्या जाणाऱ्या शब्दांची काळजीपूर्वक योजना केली नाही, तर अनर्थ घडू शकतो.**



# ताकद

अर्थेवीण पाठांतर । कायसा करावे ।
व्यर्थचि मरावे । घोकुनिया ।।

असं संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी एका अभंगात म्हणून ठेवल आहे. शब्दांच्या अर्थातली ताकद त्यांनी पुरेपूर ओळखली होती. किंबहुना संतपरंपरेतील सर्वच संतांनी अर्थवाही शब्दांची कास धरून समाजप्रबोधनाचा मार्ग अनुसरला होता. त्यामुळे मनाला भिडणाऱ्या अर्थपूर्ण शब्दांतून अभंगवाणी समृद्ध झाली होती. जनमानसात रुजली होती. पुढची कित्येक वर्षे अभंगवाणी अभंगच राहणार आहे. कारण अर्थाला महत्त्व आहे. मुखातून उच्चारल्या जाणाऱ्या वा लेखणीतून लिहिल्या जाणाऱ्या शब्दांची ताकदअर्थावर अवलंबून असते. केवळ घोकंपट्टीने शब्द पाठ होतीलही, पण त्यापाठच्या अर्थाचे काय? त्याच्या आकलनाचे काय? तुकाराम महाराजांना हेच सांगायचे आहे की, केवळ पाठांतर करू नका. त्यातून कालापव्यय होईल आणि अर्थ जाणवणारच नाही. त्यामुळे आयुष्याचे नुकसान होईल.

पण संतांना इतकंच सांगायचं नाही.

त्यापाठी खूप मोठा विचार द्यावयाचा आहे. तो आपल्या व्यक्तिमत्त्वाशी आणि पर्यायाने समाजजीवनाशी निगडित आहे.

राम गणेश गडकरी यांच्या भावबंधन नाटकात त्यांनी एक खूप चांगला विचार मांडलेला आहे. घनःश्याम हे त्या नाटकातील पात्र आहे. घनःश्याम लतिकेला म्हणतो, शब्द जिथून सुटतात तिथं काहीच खूण राहत नाही, पण ते जिथं लागतात तिथली जखम, कालांतराने बरी झाली तरी व्रण राहतोच. हे लागणं मानसिक असतं. संवेदनशील माणसाला वर्षानुवर्ष टोचणारं असतं. याचाच अर्थ वापरल्या जाणाऱ्या शब्दांची काळजीपूर्वक योजना केली नाही, तर अनर्थ घडू शकतो. रोजच्या जीवनात आपण अनेकदा खूप काही बोलत असतो. गप्पा मारत असतो, ऐकवत असतो. प्रसंग वेगळे असतात. समोर व्यक्ती असते अगर कधी कधी नसतेही, पण आपण बोलत असतो. विश्रांतीचा, ध्यानधारणेचा, अभ्यासाचा कालावधी सोडला तर शब्दांच्या उपयोगाशिवाय आपण जगूच शकत नाही. मौनव्रत पाळणारे फार थोडे असतात.

बोलणाऱ्यांच्या शब्दांकडे थोडे नीट ध्यान दिले तर लक्षात येते. अनेकदा समोरचा माणूस जे शब्द वापरतोय त्याचा अर्थ त्याला तरी कळला आहे का?

शिव्या ही वाङ्मयातली हिंसा आहे. अशी शिव्यारूपी हिंसा करणाऱ्या म्हणजेच शिव्या देणाऱ्यांना क्षणभर थांबवून त्या शिव्यांचा अर्थ विचारला तर तो शिवी देणारा ओशाळेल. कारण अनेकदा अर्थच माहीत नसतो. समाजात गैरसमज, मारामाऱ्या, द्वेष, क्रोध हे सर्व जन्माला येते ते न कळल्याने आपल्याला नेमकं काय म्हणायचं आहे याचं भान बोलणाऱ्याला आणि समोरचा काय बोलतो आहे याचं भान ऐकणाऱ्याला असलं की अनेक प्रश्न सामंजस्यानं सुटू शकतात. याचा दुसरा अर्थ असा की ही लोकशाही जीवनपद्धती झाली. किती सहजगत्या आपण ती आत्मसात करू शकतो. समोरच्याला पूर्ण बोलू देणं, त्यातला अर्थ समजून घेणं, चर्चा करणं आणि मग सर्व बाबतीतले निर्णय घेणं हे लोकशाहीला अभिप्रेत असत.

गंमत अशी आहे की माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला झळाळी प्राप्त होते ती त्यानं वापरलेल्या शब्दांमुळे. अर्थात हे शब्द वापरणं, त्याच्या शब्दांवर अनेकांचा विश्वास बसण आणि तो अनेकांच्या विश्वासाला पात्र ठरणं हे शेवटी अर्थावर अवलंबून असतं. म्हणजे शब्दांचा अर्थ ही त्याची जीवनशैली असावी लागते. तो जे शब्द वापरतो ते त्याच्या स्वतःच्या जीवनात उपयोगात आणतो का यावर त्याची विश्वासार्हता अवलंबून असते. समाजपुरुष याचं बारकाईन अवलोकन करत असतो. पाणी जपून वापरा, हे शब्द ऐकवणारा जर स्वतःच्या आयुष्यात पाण्याचा गैरवापर करत असेल तर त्याच्यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. कारण त्यानं उच्चारलेल्या शब्दांचा अर्थ त्याला कळला नाही आणि त्याला त्याच्या वैयक्तिक आयुष्यात उपयोगात आणता आला नाही.

महाभारतातील धर्मराजाला, ‘सत्यं वद’ हे शब्द पाठ होत नव्हते. याचं कारण देताना तो म्हणाला होता, शब्द नुसते पाठ करून काय उपयोग, त्यातून व्यक्त होणारा अर्थ जर मी जीवनात उपयोगात आणू शकलो नाही, तर नुसत्या पाठांतराला काहीच अर्थ उरणार नाही. तुकाराम महाराजांना नेमकं हेच सांगायचं होत.

# पर्यावरण

**मागील अंकात आपण 'पर्यावरण महर्षी' श्री गुरुदेव दत्त यांनी पर्यावरणातील २० घटकांना स्वतःचे गुरुस्थानी स्थान दिले यातील पहिला घटक 'पृथ्वी'बद्दल माहिती घेतली. या अंकात आपण वारा या घटकाची माहिती घेऊ.**

## वारा

भगवान श्री दत्तगुरूंनी वाऱ्याला (वायू, हवा) आपला दुसरा गुरू मानले आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार मुळात वारा अथवा हवा ही नेहमी स्वच्छ निर्मळ, गंधहीन असते. पण हाच वारा जेव्हा अग्नीवरून वाहतो तेव्हा तो आपल्याला उष्ण वाटतो, तर बर्फावरून वाहताना तो थंडही वाटतो. तसेच पाण्यावरून वारा वाहतो तेव्हाही थंड वाटतो.

पण मुळातच हवेचा (वाऱ्याचा) मूळ गुणधर्म नाहीच. कारण काही वेळातच पुढे गेल्यावर तो आपले मूळ रूप धारण करतो. वारा (हवा) गंधहीन आहे. पण सुगंधी ताटव्यावरून जाताना तो सुगंध बरोबर नेतो. दुर्गंधी युक्त पदार्थावरून जातांना तो दुर्गंध वाहून नेतो. हे सर्व करताना त्यामध्ये गुंतत नाही. पुढे तो वाहतच असतो व सुगंध, दुर्गंध त्यागून तो निष्कलंक राहतो.

यामधून आपण सर्वांनी हाच संदेश घ्यायचा आहे की वाऱ्याप्रमाणे अलिप्ततेचा गुण घेणे हे महत्त्वाचे असे दत्तगुरूंना जाणवले, कारण हवा जर बिघडली तर ती वादळही निर्माण करू शकते. त्याचप्रमाणे माणसाचे मन कलुषित झाल्यास ते जगात अस्वस्थता आणू शकेल, असे श्री दत्तगुरू पर्यावरण महर्षी यांना जाणवल्यामुळे त्यांनी वाऱ्याला आपले दुसरे गुरू केले.



**– डॉ. प्रमोद प्र. मोघे**
**पर्यावरण तज्ज्ञ, मो. ९३२५३८००९३**

## निवेदन

परदेशी शिक्षण–नोकरी–व्यवसाय यासाठी जाणारे भारतीय स्वतःच्या इतिहास व संस्कृतीबद्दल बहुधा काहीच जाण नसलेले असतात. एखादा परकीय वा त्या देशांतील त्यांचे समवयस्क त्यांना शिवाजी, गौतम बुद्ध, रामायण, महाभारत, वेद, तक्षशिला, नालंदा, अजंठा, वेरुळ याबद्दल गप्पांच्या ओघात काही प्रश्न विचारतात त्यावेळी काही नीट सांगता न आल्याने भंबेरी उडते. सर्वज्ञ कुणीच नसतो; परंतु बऱ्यापैकी माहिती असणे गरजेचे आहे. हे लक्षात आल्याने आपले ज्ञातिबांधव या बाबतीत मागे पडू नयेत या दृष्टीने मी एक प्रयोग करू इच्छितो. माझ्या चेंबूरच्या घरी मी १५ दिवसांतून एकदा/दोनदा भारतीय इतिहास व संस्कृतीवर एक ते दीड तास वर्ग घेईन. या विषयांवर माझी अलीकडेच तीन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. कऱ्हाडे ज्ञातिबांधवानी आपल्या मित्रमंडळींना याची माहिती द्यावी. अधिक माहितीसाठी श्री. जयंत लघाटे वा श्रीमती शेंबेकर यांच्याशी संपर्क साधावा.

– अरुण निगुडकर
फोन. २५२२६२९३

## बोधकथा

गुप्तकाळाला सुवर्णयुग म्हटले जाते. सम्राट चंद्रगुप्त मौर्य हा गुप्तवंशातला नावाजलेला राजा होता. त्याच्या भेटीसाठी एक चिनी प्रवासी राजधानी पाटलीपुत्र (सध्याचे पाटणा शहर) येथे आला. तो प्रथम अमात्याच्या भेटीसाठी गेला. त्या वेळी अमात्य समईच्या प्रकाशात लिहीत बसला होता. त्याने त्या चिनी प्रवाशाला हाताने बसण्याची खूण केली. प्रवासी बसला. थोड्याच वेळात अमात्यांचे लेखन संपले. त्याने पेटती समई विझवली. दुसरी समई पेटविली. प्रवाशाला म्हणाला, ''हं बोला'' बुचकळ्यात पडलेला प्रवासी म्हणाला. ''अमात्यमहाराज प्रथम मला हे सांगा की आपण एक समई विझवून दुसरी का पेटविली?'' अमात्य म्हणाले, ''ती समाई व तेल यावर राजकोषातून खर्च होतो. सरकारी काम संपले म्हणून ती समई विझविली. आता जी समई पेटत आहे तिचा खर्च माझ्या पगारातून होणार आहे.'' चिनी प्रवासी अवाक् झाला.

भारतात पूर्वी सोन्याचा धूर निघत होता. याचा अर्थ आपण मर्यादेत घेतो. तो फक्त सोन्याचा धूर नव्हता. सचोटी, काटकसर, प्रामाणिकपणा, राष्ट्रनिष्ठा अशी कितीतरी नाणी त्या वेळी चलनात होती. त्या सद्गुणांचा सुद्धा सुवास दरवळत होता. धूर निघत होता. आजच्या जमान्यात अभावानेच आढळणाऱ्या या सद्गुणांनाच खरे सोने म्हटले पाहिजे. शिस्त ही वरून खाली संक्रमित होते असे म्हणतात. या न्यायाने तत्कालीन प्रजेमध्येसुद्धा हे गुण असणारच, नव्हे होतेच. सुवर्णभूमी हा शब्द त्यातूनच बनला असावा.



(संग्रहित)
**– विनायक गो. उमर्ये, आजगांव**
**मोबा. नं. ९४२३८८०१३८**

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**

**THE DESIGN STUDIO**

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# ‘चैत्रोत्सव’ : कऱ्हाडे ब्राह्मण संघ – मुलुंड

संस्थावृत्त

कऱ्हाडे ब्राह्मणसंघ मुलुंड यांचेतर्फे रवि. दि. १९ एप्रिल २०१५ रोजी सायं. ५ वा. विरंगुळा सभागृह मुंबई पूर्व येथे ‘चैत्रोत्सव’ कार्यक्रम झाला. त्यानिमित्त संगीत कार्यक्रमांतर्गत ‘कीर्तना’चा कार्यक्रम आयोजित केला होता. डोंबिवली येथील सौ. प्राची मंदार व्यास या तरुण कीर्तनकाराचं ‘पौड्रिक’ आख्यानावर उत्कृष्ट कीर्तन सादर झाले. ‘सीतेचा वेगळा आविष्कार–वेगळे रूप’ या आख्यानातून त्यांनी उभे केले. उपस्थितांनाही हा विषय नवाच होता. त्यामुळे शेवटपर्यंत कोणीही जागेवरून उठले नाही हे विशेष. श्री. गंगाधरबुवा व्यास यांचे कुटुंबातील एकूण १४ जणं कीर्तनकार आहेत. या घराण्यात ३ पिढ्यांची कीर्तन परंपरा असून सर्व भावंडे पूर्णपणे कीर्तनव्यवसायात आहेत. सौ. प्राची व्यास–सून आहे – ३१ वय. गेली १० वर्षे महाराष्ट्रात सर्वत्र कीर्तन करतात.

आमचे ज्येष्ठ सभासद श्री. माधवराव शेंबेकर यांनी पत्नी कै. सौ. मालती माधव शेंबेकर यांचे स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून चैत्र महिन्यात ‘डाळ–पन्हे–खिरापत’ आणि यानिमित्त संगीत कार्यक्रमाचे प्रायोजक श्री. जयंत वाकणकर यांचे सहकार्याने ‘चैत्रोत्सव’ कार्यक्रम या वर्षापासून सुरू झाला आहे. कीर्तन परंपरेची माहिती पुढील पिढीस व्हावी, या उद्देशाने दरवर्षी कीर्तन ठेवावे, असे उपस्थितांनी सांगितले.

अध्यक्ष मंडपे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यवाह माधुरी शेंबेकर यांनी प्रास्ताविक केले. नवीन सभासदांचे स्वागत झाले विवेक शहाणे यांनी कीर्तनकार आणि त्यांचे सहकारी यांचा परिचय करून दिला. सदानंद सरपोतदार यांनी आभार व्यक्त केले. श्री. वामनराव आठल्ये यांच्या सहकार्याने योग्य कीर्तनकार आम्हाला मिळाले. कार्यक्रमाला अनेक भाविकांची उपस्थिती होती.



**कीर्तन – सौ. प्राची व्यास व आरती – सौ. योगिता वाकणकर**

**ARUNDHATI KOPARKAR**
M.: 98811 57579

**AMOL KOPARKAR**
M.: 98222 95720

Tastes Food

you dream it
we design it

**Our Services**

- Outdoor Catering Services
- Banquet Catering
- Other Banqueting Celebrations
- Corporate & Industrial Catering Services

**SHRIPAD NANIWADEKAR**
M.: 988220 32105

**SANJAY NANIWADEKAR**
M.: 98226 76293

॥ श्री ॥
नानिवडेकर बंधू यांचे
वरद
केटरर्स

**Our Services**
a. Traditional Catering
b. Other Traditional Fuctions
c. Marriage Halls Catering Services

**Regd. Office**
104, Mayuresh Apt.
Mayur Colony, Kothrud,
Pune - 411038.

## निवेदन

महासंघातर्फे सर्व वर्गणीदारांना १५-१६ ची वर्गणी जमा करण्याबाबत स्मरणपत्रे पाठवण्याचे काम डिसें. १४ पासून एप्रिल-मे २०१५ पर्यंत सुरू होते.

या दरम्यान कांही सभासदांनी त्यांच्या संघाच्या कार्यालयामध्ये, तर काहींनी थेट बँकेत आपली वर्गणी जमा केली व त्यामध्ये ही वर्गणी कुणी पाठवली याचा उल्लेख नसल्याने वर्गणी पाववूनही त्यांच्या नावावर ती जमा होऊ शकली नाही. तर काही संघांनी वर्गणी जमा केली. परंतु त्यांची यादी पाठवली नाही/उशिरा पाठवली.

याबद्दल काही संघांतर्फे नाराजी व्यक्त करण्यात आली. याबद्दल खुलासा करण्यात येतो की ज्या सभासदांनी थेट वर्गणी पाठवली असेल किंवा यापुढे पाठवणार असतील तर त्यांनी कॅश डिपॉझिट स्लिपवर आपले नाव, शहराचे नाव व आपला सभासद क्र. लिहून कॅशिअरना करण्याची विनंती करावी. तसेच ज्या संघांनी सभासद वर्गणी जमा केली असेल त्यांनी शहराचे नांव लिहावे आणि वर्गणीदारांची यादी त्वरित ई-मेलवर अथवा टाईप करून महासंघाकडे सभासद क्रमांकासह पाठवावी.

यामुळे सर्वांचा वेळ वाचेल आणि कोणाचेही गैरसमज होणार नाहीत. ज्या सभासदांनी वर्गणी जमा करूनसुद्धा जर त्यांना महासंघाकडून स्मरणपत्र आले असेल तर त्याकडे दुर्लक्ष करावे. या झालेल्या पत्रव्यवहारामुळे जर कोणास वैयक्तिक त्रास झाला असेल, तर संपादक म्हणून मी दिलगिरी व्यक्त करीत आहे.

# तालचक्र म्युझिक अॅकॅडमीचे आगळेवेगळे उद्घाटन

मा. श्री. दिवाकर डेंगळे यांच्या कल्पनेतून तालचक्र म्युझिक अॅकॅडमीचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने उद्घाटन झाले. या वेळी मा. पंडिता मंजुषा पाटील यांनी 'रंगी तारी गुलाबी चुनरिया' हा दादरा सादर केला आणि नंतर 'माई सावरी' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. विशेष म्हणजे पंडिता मंजुषा पाटील यांनी सादर केलेल्या दादऱ्याला पद्मश्री विजय घाटे यांनी तबल्यावर साथ केली. शीतल कोलवालकर यांनी नृत्य सादर केले आणि सर्व उपस्थितांना या त्रयीने मंत्रमुग्ध केले. डॉ. दिवाकर डेंगळे कलादालन हे गुरुकृपा, अलकापुरी सोसायटी, वनाज कॉर्नर, कोथरूड येथे असून पद्मश्री विजय घाटे हे स्वतः तबल्याचे प्रशिक्षण देणार आहेत.

**जीवन हे हार्मोनियमसारखे असते...**
**सुखाच्या पांढऱ्या पट्ट्या तर दुःखाच्या पट्ट्या काळ्या**



**पण गंमत म्हणजे दोन्ही एकत्र वाजल्याशिवाय सुरेल जीवन संगीत निर्माणच होत नाही.**

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**
इंटरिअर डेकोरेटर्स
श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ अॅल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरूम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

**With Best Compliments**

**Dynamic Engineers**

7/2 Behind K.E.B Power Station
Udyambag – BELGAUM
590008

CMFRS. mechanical
(Railway) Jacks

P.M. Puranik
09448480607

## व्यक्तीपरिचय

# सदाशिव गोविंद कात्रे

कुष्ठ रोग्यांना सर्व साधारण समाज अत्यंत घृणास्पद रीतीने वागवतो . काही लोक या आजाराला पूर्व जन्मीचे पाप समजतात . अश्या रोग्यांची सेवा हे ध्येय मानून कार्य करणारे श्री. सदाशिव गोविंद कात्रे हे आधुनिक भगीरथ आहेत . त्यांचा जन्म २३ नोव्हेंबर १९०१ रोजी मध्य प्रदेशातील गुणा जिल्यात झाला धार्मिक संस्काराच्या कुटुंबात जन्मल्यामुळे त्यांच्यावर लहानपणीच चांगले संस्कार झाले. आठव्या वर्षीच त्यांच्या वडिलांच्या निधनामुळे ते पोरके झाले . त्यानंतर त्यांचे पालन पोषण झांशी येथे त्यांच्या काकानी केले. वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे त्यांना जबाबदारीची चांगली जाणीव होती. किशोरावस्थेत क्रान्ती केसरी चंद्रशेखर आझाद यांच्याशी झालेल्या तेजस्वी सान्निध्यामुळे प्रेरित होऊन देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरिता काही भव्य दिव्य करावे ही अंतरीची इच्छा. सन १९२८ मध्ये त्यांना परिस्थितीमुळे रेल्वेत नोकरी करावी लागली. सन १९३० मध्ये त्यांचा विवाह झाला. एका कन्येला जन्म देऊन ७ –८ वर्षाच्या संसारानंतर पत्नीचे देहावसान झाले. मातेच्या मायेला भुकेलेल्या कन्येचा सांभाळ करताना त्यांच्या लक्षात आले की त्यांना स्वतःला कुष्ठ रोग झालेला आहे.

संवेदनशील असलेला देह जास्त अपंग होऊ नये म्हणून कन्येला नातेवाईकांकडे सोपवून कुष्ठ चिकित्सेसाठी घराबाहेर पडले. त्याकाळी कुष्ठ चिकित्सेचा एकाधिकार ख्रिश्चन मिशनरी संस्थांकडेच होता. अशाच एका संस्थेत त्यांनी प्रवेश घेतला. कारागृहांसारखेच या संस्थांचे स्वरूप असे व समाजाशी यत्किंचितही संपर्क नसे . याला कारण तत्कालीन सामाजिक परिस्थिती. या रोग्यांना समाज वाळीत टाकीत असे. रोगाबाबतचे गैरसमज इतके पराकोटीला गेले होते की, कुष्ठ पीडितांना घृणेतून समाज वाळीत टाकत असे. समाज मन इतके पोखरलेले होते की कुष्ठ पीडितांचे नातेवाईक क्षणात परके होत. जोवर स्वतःला कुष्ठ रोग होत नाही तोवर कुष्ठ पीडितांवर लादलेले हीन जीवन कळणे कठीणच!

भारतीय समाज पण कुष्ठ रोग्यांना पापी समजू लागला होता. अशा पापी माणसाच्या परिवाराकडे समाजाचेही स्वाभाविकपणे दुर्लक्षच होऊ लागले. कुष्ठ पीडितांविषयी समाज मनात रुजलेल्या हीन भावनेमुळे रोग्यांचे मानसिक खच्चीकरण होत असे व त्यामुळे सर्व रोग्यांचे जीवन अंधारून गेले. स्वतः कुष्ठमुक्त होऊन आपल्या कुष्ठ बांधवांसाठी सेवा कार्य सुरू करणे हाच एकमेव उपाय असल्याचे श्री कात्रे यांच्या लक्षात आले. श्री कात्रे यांची कन्या उपवर झालेली व तशात स्वतःला कुष्ठरोग झालेला यामुळे त्यांना खूप काळजी लागली. पण कन्येचे नशीब चांगले होते. तिला योग्य जीवनसाथी मिळाला.



नातेवाईक व मुलीच्या सासरकडील लोक यांच्या कठोर व्यवहाराचे चटके कुष्ठरोगामुळे श्री कात्रेजी सतत अनुभवत असत. यातूनच कात्रेजींच्या मनात संस्था स्थापन करण्याविषयी बळकटी येऊ लागली. आपल्या भारतीय समाजाने कुष्ठपीडितांना पापी म्हणून वाळीत टाकणे हे कात्रेजींच्या मनाला पटले नाही. तसेच त्यांनी युरोपातील कुष्ठ रोग्यांचापण अभ्यास केला. तेथेही सामाजिक परिस्थिती अशीच होती किंबहुना याहून वाईट होती. त्यांचेवरील उपचार पूर्ण झाल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना कुष्ठमुक्त झाल्याचे प्रमाणपत्र देऊन रेल्वेच्या सेवेत पुन्हा रुजू होण्यास हरकत नसल्याचे सांगितले. डॉक्टरांचे प्रमाणपत्र मिळाले तरी ते आता नोकरीत राहू इच्छित नव्हते. त्यांचा संकल्प निश्चित झाला होता की आपणच जनतेच्या साहाय्याने एक राष्ट्रीय सेवा कार्य उभारावे व परत नोकरीत वा परीवारात जावयाचे नाही.

जरी कुष्ठसेवा केंद्र चालववयाचे असे ठरलेले असले तरी साहाय्य कोण करणार हा प्रश्न होताच! त्यांचे गुरुस्थानी असलेले श्री. गोळवलकर यांनीच तो प्रश्न सोडवला. ओळखीची काही मंडळी मदतनीस म्हणून त्यांनी दिली व भारतीय कुष्ठ निवारक संघ या नावाने संस्था चालू झाली. विलासपूर जवळील चांपा येथे ०५–०४–१९६२ रोजी संस्थेच्या मुख्य कार्यालयाची शासन दरबारी नोंदणी झाली. संस्था स्थापन झाली तरी सेवा कार्याच्या आरम्भासाठी योग्य अशी भूमी आवश्यक होती. त्यासाठी श्री कात्रे यांनी जनसंपर्क आरंभिला.

कात्रेजी आपला संस्था स्थापन करण्याचा उद्देश लोकांसमोर ठेवीत. गावा–गावातून कधी सायकलने तर कधी पायी प्रवास करून त्यांनी कुष्ठरोग निवारण साध्य असून तो सांसर्गिक वा आनुवंशिक नाही याचा जनमानसात प्रचार केला . कुष्ठरोगाबाबत सर्वत्र पसरलेले गैरसमज दूर करून भारतीय मानस पुन्हा स्वच्छ करण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात केले. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन त्यांना संस्थेसाठी एका शेतकऱ्याने अर्धा एकर पडीक जमीन, त्यातली पडकी विहीर व धर्मशाळा दान म्हणून दिली. संस्था स्थापनेच्या प्रारंभापासून आरंभिलेल्या प्रचारातून कात्रेजींजवळ दान म्हणून स्वीकारलेली अल्पराशी संग्रहित झाली होती. त्यात स्वतःची रेल्वे विभागाकडून मिळालेली भविष्य निर्वाह निधीची रक्कमही कात्रेजींनी जमा केली.

शेतकऱ्याकडून मिळालेल्या जमिनीवर तीन खोल्यांचे मातीचे घर बांधले व एका सेवा भावी स्थानीय डॉक्टर यांच्या मदतीने निवासी रुग्ण म्हणून तीन कुष्ठरुग्णांना चिकित्सेसाठी प्रवेश दिला. चांपा नगरातील व आसपासच्या गावांशी संपर्क साधून भोजनापूर्वी एक मूठ तांदूळ कुष्ठरोग्यांसाठी बाजूला काढण्याचे त्यांचे तंत्र यशस्वी झाले. त्या सर्व मातृ वृन्दान्ना या सर्व गोष्टींचे महत्व पटले व सेवाभाव मूलतःच असल्याने त्या मातांनी खूप सहकार्य केले. कुष्ठरोग्यांबद्दल भीती जरी वाटत असली तरी कुष्ठ पीडितांची क्षुधाशांती हे फार मोठे पुण्य आहे अशी श्रद्धा जनमानसात जागृत झाली.

ज्या भूमीत संस्थेचा कार्यारंभ झाला तिच्या आसपास अनेक एकर जमीन पडीक होती. गावापासून दूर असल्याने पिकाची राखण शक्य नसल्याने दुर्लक्षित होती. हळूहळू जसजसे पैसे जमा होत गेले तसतसे त्यांनी या जमिनी विकत घेण्यास प्रारंभ

**पान क्र.११ वर**

nakhye
UDYOG
AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS
ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.
M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **+91251 2482106, +91251 2483476.**
•**SHOP NO.1:** Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - **97026 55000.**
•**SHOP NO.2:** Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - **+91251 2433193. Mo. - 9702811122.**

Shubhmangal
CATERERS & AC HALL
Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL
AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES
M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS
**DISTRIBUTORS FOR**
**Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),**
**Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy**
Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351**. Email: **anakhye@gmail.com**

finVantage
**EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,**
**Mutual Fund, Realty, Life and General Insurance,**
**PMS and Financial Planning Advisory**
M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: **91251 2480305**

## क्षमस्व

मागील एप्रिल १५ च्या संपर्कमध्ये काही लेखकांचे नाव नजरचुकीने राहून गेले. त्याबद्दल संपादक मंडळ दिलगीर आहे.

१. कुल आणि शील – ग. वि. ठेकेदार पुणे
२. मराठीतील सदाबहारगीते – गणेश गुर्जर पुणे
३. कानडी भाषेतील भाषणाचा अनुवाद – कु. संपदा कुलकर्णी पुणे
४. पाककृती – सौ. लीना मुळ्ये पुणे

याच प्रमाणे 'गाऊ त्यांची आरती'मध्ये काही नावे टंकलेखनामध्ये चुकली आहेत.

१. झुंजार स्वातंत्र्य सेनानी तांबे – नेवळकर ऐवजी नेवाळकर हवे.
२. लोकसभेचे सभापती – गणेश बी. मावळकर ऐवजी मावळंकर हवे.
३. महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री – बी. जी. खैर ऐवजी खरे हवे.

## हार्दिक अभिनंदन

मा. रवींद्र प्रभुदेसाई, प्रमुख पितांबरी प्रॉडक्ट ढाणे आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणेचे अध्यक्ष यांना नुकताच 'कोकण आयडॉल' २०१५ हा पुरस्कार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पितांबरी उद्योग समुहाने ग्राहकांच्या उपयोगी अशी अनेक उत्पादने निर्माण केली आहेत. याचे सर्व श्रेय मा. रवींद्र प्रभुदेसाई यांना जाते. विविध ब्राह्मण संस्था. ब्राह्मणांसाठीचे उपक्रमात मा. प्रभुदेसाई यांचे मोठे आणि उल्लेखनिय कार्य आहे.

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघातर्फे मा. रवींद्र प्रभुदेसाई यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा.



काव्यांजली

**'मी' 'तू' 'तू' 'मी'**

मी भविष्य, तू घडविणारा,
तू देणारा, मी घेणारा,
मी सागर, तू किनारा,
तू तारणारा, मी तरणारा,
मी शिकणारा, तू शिकवणारा,
तू बघणारा, मी दिसणारा,
मी याचक, तू देणारा,
तू वाचक, मी वाचणारा,
मी वाहणारा, तू थांबवणारा,
तू पालक, मी चालक,
मी बालक तू मालक.

**– वासुदेव द. हर्डीकर, मो.नं. ९९६९१९३३२८**

**पान क्र.९ वरून**

## व्यक्तीपरिचय
## सदाशिव गोविंद कात्रे

केला. निवासी रुग्णांना त्या जमिनीत श्रम करण्यास प्रेरित केले. मुष्टीदानातून कुष्ठ पीडितांची होत असलेली क्षुधाशांती पाहून अनेक परिवारातील माता मुष्टीदानासाठी तयार झाल्या. तांदुळाचे जसे प्रमाण वाढले तसे कुष्ठ पीडितांची संख्येतही वाढ होऊ लागली. आता कात्रेजींनी कुष्ठ पीडितांच्या चरितार्थासाठी शासकीय अनुदान प्राप्त व्हावे असा जोरदार प्रयत्न आरंभिला. सुरुवातीस यश मिळेना तेंव्हा त्यांनी तत्कालीन पंतप्रधान स्व. लाल बहादूर शास्त्री यांना पत्र लिहिले. त्यात त्यांना यश येऊन शास्त्रीजी यांनी तत्कालीन मध्यप्रदेश शासनाला आदेश दिले व तेंव्हापासून अल्प स्वरूपात अनुदान मिळणे सुरू झाले. कुष्ठरोगाविषयीच्या गैर समजाची स्वतःलाच झळ लागल्याने समाजाचा कुष्ठपीडितांना विषयीचा भ्रामक दृष्टीकोन व त्यातून समाजाच्या कुष्ठ पीडितांशी होत असलेल्या अमानवी व्यवहारात परिवर्तन होऊन समाज आपलेपणाने कसा व्यवहार करेल हाच मुख्य प्रश्न त्यांना सतावीत होता. १६ मे १९७७ रोजी या भगीरथाचे देहावसान झाले. कात्रेजींची कुष्ठ पीडितांना एकच शिकवण असे की समाजात पसरलेले गैरसमज दूर करण्याची जबाबदारी आपली पण आहे . त्यासाठी शक्य असलेले सर्व काम करा. स्वाभिमानाचा मनात झालेला संचार स्वावलंबनाला अंगीकृत करण्याची प्रेरणा मानवाला देत असतो. ही शिकवण शिरोधार्य मानून कुष्ठपीडितांनी संस्थेने विकत घेतलेली पडीक जमीन कशी सुपीक होईल यासाठी खूप कष्ट घेतले. GOD HELPS THOSE WHO HELP THEMSELVES या इंग्रजी उक्ती प्रमाणे कुष्ठ पीडितांची श्रमनिष्ठा पाहून कृषी विभागातून सहाय्यक कृषी संचालक म्हणून निवृत्त झालेले श्री. वरवंडकर कुष्ठ पीडितांचे कृषी सल्लागार बनले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची ८० एकर जमीन कुष्ठपीडितांनी हिरवीगार बनवली कुष्ठरोगाच्या वास्तविकतेचा प्रचार व्हावा म्हणून लखनौच्या अखिल भारतीय विद्या भारती संस्थांकडून संचालित सर्व प्रांतातील विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सील तिकीट विक्री माध्यमातून या कुष्ठसेवा कार्याला मदत केली. य़ा आर्थिक सहयोगातून संस्थेने कुष्ठ पीडितांच्या मुला–मुलींसाठी वसतीगृह सुरू केले. कळताच उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, ओरिसा, प.बंगाल, दिल्ली इ. भागातून कुष्ठ वस्त्यांतून रहात असलेले आपल्या बालकांना घेऊन वसतिगृहात प्रवेश मिळावा म्हणून संस्थेत येऊ लागली. संस्था कार्याचा व त्याच्या उद्देश्याचा परिचय समाजाला व्हावा म्हणून प्रयास केले तरी स्थानिक वर्तमानपत्रातून त्यांना स्थान मिळत नसे. पादत्राण कुठे त्रास देते हे जसे घालणाऱ्यास कळते तद्वतच कुष्ठरोग्याचे आहे. या संस्थेत २०१३ च्या प्रारंभी ६८ पुरुष व ९६ महिला होत्या. २०१३ च्या वर्ष अखेरीस रुग्णांना उपचार करून परत पाठवलेले आहेत. आता सध्या १४४ आहेत (३१ मार्च २०१४ अखेरीस) एका कऱ्हाडे ब्राह्मणाने सुरू केलेल्या या संस्थेस कोणास मदत करण्याची इच्छा असल्यास संस्थेची माहिती खालील प्रमाणे : भारतीय कुष्ठ निवारक संघ (स्थापना १९६२) कात्रेनगर, चांपा – ४९५६७१, जि. – जान्जगीर (छत्तीसगड), फो. – ०७८१९–२०१२५६, २०१७४०, मो. – ९९२६११३८२६,

**SBI CHAMPA,** CODE NO. 4572, IFSC No. SBIN0004572 A/c No. 10728947961.

**PNB SIWNI CHAMPA,** CODE No. 3174, IFSC No. PUNB 0317400 A/c No. 3174000100032243.

**CBI CHAMPA,** CODE No. 0792, IFSC No. CBIN 0280792 A/c No. 2175085708.

**BOM BILASPUR,** CODE No. 0460 IFSC No. MAHB0000460 A/c No. 20152092217,

WEBSITE : www.bkns.org
EMAIL : bknskatrenagargmail.com

# Dr. Moonje's ideologies and thoughts should be promoted : Chief Minister

Chief Minister (CM) of Maharashtra Devendra Fadanvis recently visited Central Hindu Military Education Society's (CHME) Bhonsala Military School (BMS). He released the Hindi version of Dr. Moonje's biography in the spectacular event held at Bhonsala ground.

The programme began with the grand welcome of Fadanvis by all the dignitaries of CHME society. CM garlanded the idol of Dharmaveer Dr. Moonje on this occasion. Later, all the dignitaries of CHME Society were introduced.

Ramdandees of BMS gave a general salute which was followed by the march past with the tunes of ghoshpathak.

The introductory speech was given by general secretary of CHME Society Pramodji Kulkarni. He welcomed and introduced CM in his speech. Translator of Dr. Moonje biography's Hindi version, Dr. Chandrakant Moghe was felicitated at the hands of CM. Rajabhau Pofali and Upendra Shirgaonkar were also honoured on the occasion. CM along with Dadasaheb Ratnaparkhi released the book. Dr. Chandrakant Moghe expressed his feelings and said, "I am overwhelmed to share my thoughts about this book which is very special for me. I am deeply involved with the characters of this book, "While addressing the audience CM Said, "Ideologies and thoughts of Dr. Moonje should be promoted and translation of his biography will definitely help for the same. All the employees and officials of CHME society are really working hard to fulfill the dream of Dr. Moonje."



This organisation has given several good citizens, players, officers and soldiers to the society. He also admired inculcation of values, discipline and patriotism in BMS.

Vote of thanks was proposed by president of CHME society Vasant Bedekar. All the officials of CHME society took efforts to make the event successful. MP Harishchandra Chavan, Hemant Godse, legislative council member Dr. Apoorv Hiray, MLA Balasaheb Sanap, Devyani Farande and Seema Hiray among others attended the programme.


।। रेशीम गांठी ।।®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समूपदेशन
वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे


## का व्यां ज ली

## ‘रामराया’

काय मागु मी कैसे मागू ?
राघवा घालु कसे साकडे ।।धृ।।
युवराज्याचा तू अधिकारी
परि वनवासी वल्कलधारी ।।१।।
कंदमुळांवर क्षुधा निवारी
मागु कसे मी अन्नवस्त्र वा
घनकांचन रोकडे?
राघवा घालु कसे साकडे? ।।२।।
सीता वरिली जिंकुनिया पण
तिज अपहारी राक्षस रावण
जनापवादे त्याग पुन्हा पण
चिरविरही तू!
मागू कसे मी दंपति सुख लालडे?
राघवा घालू कसे साकडे? ।।३।।
लवकुश बाळे तुझी गोजिरी
दूर आश्रमी अनाथापरी
वात्सल्यासहि वंचित तू तरी
माझ्यासाठी मागु कसे मी
संततीसुख भाबडे?
राघवा घालू कसे साकडे? ।।४।।
सदैव केले तू जनरंजन
तथापि न चुके प्रवाद दारुण
जननिंदेने व्यथित तुझे मन
लौकिक मागू तरी कसा मी
मला कोडे पडे?
राघवा घालू कसे साकडे? ।।५।।
विरहव्यथा वनवास अकारण
सदा यातना अनंत सोसुन
तीव्र कष्टमय तुझेच जीवन
आणिक मी का कष्टी करू तुज
पिळवटते आतडे?
राघवा घालू कसे साकडे? ।।६।।
त्यागाचा तू सजीव पुतळा
कामार्थी मी लोभी दुबळा
याचनेस मी हात पसरला
हीच खरोखर चूक भयंकर
माझी मज उलगडे
काय मागू तर क्षमाच मागू
उत्तर हे सापडे ।।७।।

**– किशोर गं. ठेकेदार, मो. ९३७३५९७४७६**

## व्यक्तिपरिचय

# श्री. अरुण निगुडकर

आमच्या ‘स्पर्श दिव्यत्वाचा’ या संगीत कार्यक्रमात प्रेक्षक म्हणून आलेले सौ. व श्री. अरुण निगुडकर – तिळगुळ समारंभावेळी संघाचे सभासद झाले. त्या वेळी नवीन सभासदांचा परिचय करून देताना त्यांच काही वेगळेपण जाणवलं. ते आपणासर्वांना माहीत असावं म्हणून थोडक्यात माहिती देत आहे. श्री. अरुण व सौ. उषाताई निगुडकर चेंबूर (मुंबई) येथे राहतात. साधारण ४५ वर्षे सरकारी नोकरी वेगवेगळ्या खात्यांत (अंदाजे १०–१५) केली. त्यावेळी प्रामुख्याने पब्लिसिटी, टुरिझम आणि जाहिरात क्षेत्र यातील कामाचा अनुभव मिळाला.

नंतर स्वतःची जाहिरात एजन्सी (Advertising Agency) सुरू केली. प्रामुख्याने शिपिंग कॉर्पोरेशनची जाहिरात, वर्तमानपत्रासाठी लागणाऱ्या जाहिरातीसाठी एजंट म्हणून काम करताना भारतीय संस्कृती, तिची प्रतीके, मंदिरे, त्यांच्या बांधकामाची शैली या सर्वांचं ऐतिहासिक आणि आत्ताच्या काळातील महत्त्व – अशा विषयांवर चांगला अभ्यास झाला. हा अभ्यास निवृत्तीनंतर समाजाला उपयोगी पडेल यासाठी पुस्तकरूपाने ग्रंथित झाला. त्यांची ३ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.



श्री. अरुण गणेश निगुडकर
०२२–२५२२६२९३

१) शोध अज्ञाताचा – (भारतीय संस्कृती आणि इतिहास यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास)

२) वेध भारतीय संस्कृतीचा – (वैज्ञानिकदृष्ट्या एक मागोवा, एक शोध, एक चिंतन)

३) ॲलेक्झांडर जगज्जेता झाला नाही – (रणभूमीचे सत्यकथन) – या पुस्तकात ४८ लेख या विषयाची सत्यता दाखविणारे आहेत. वर्तमानपत्रातून त्यावर परीक्षणही आले आहे. पण कोणीही याविरुद्ध विचार प्रगट केले नाहीत हे विशेष!

तर अशा प्रकारच्या साहित्याचा उपयोग मुलांना इतिहासाची गोडी लागेल, परदेशी जाणाऱ्या तरुणांसाठी, पर्यटकांसाठी अतिशय उपयोगी आहे. परदेशी इथे येऊन आपल्या संस्कृतीची, मंदिरांची वगैरे माहिती घेतात, अभ्यास करतात. पण आपली मुले मात्र हे विसरून चाललीत. का तर अशा अभ्यासासाठी माहिती करून घेण्यासाठी वेळ नाही, आवड नाही. पण श्री. अरुण निगुडकर यांचे मते जर कोणी इच्छुक/ग्रूपला एकत्रित माहिती हवी असेल तर त्यांना द्यायला ते तयार आहेत. अतिशय उपयुक्त माहिती स्लाईडशोच्या माध्यमातूनही सांगू शकतील किंवा त्यांच्या घरीही गेलात तरीही छान माहिती देतील. तरी इच्छुकांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

शब्दांकन : जयंत लघाटे (मुलुंड)

### काव्यांजली

## जीवन सार्थक झाले

माणूस एकटाच येतो
परत एकटाच जातो
मग कशासाठी अभिमान करावा?
कुणावर क्रोध करावा?
आत्मा निघून जातो
शरीर जागच्या जागीच राहते
मग ईर्षा कां करावी माणसाने?
मग वैरवृत्ती कां करावी
माणसाने?
सद्गुणांना जवळ करून
दुर्गुणांना दूर फेकून देईल.
प्रेमाने स्नेहाने जगत राहून
दया, प्रेम जतन करेल.
मग लोभ, लालसा कशासाठी?
कुणासाठी?
ईश्वरांत श्रद्धा ठेवून मानवी
जन्माचे सार्थक करीन
आई–वडिलांची सेवा करून
त्यांचे खूप शुभाशीर्वाद मिळवीन.
हीच माझी खूप खूप शुभेच्छा.

**– शैलजा गवारीकर**

## कामाचा महिमा

जो करितो काम
अन् गाळितो घाम
तो मिळवितो दाम
सूत्र हे ध्यानांत ठेवा
जो टाळितो काम
तो करितो आराम
ना मिळवितो छदाम
हे सुद्धा ध्यानांत ठेवा
जो कुरवाळितो काम
त्याचे काम हेच धाम
त्याच्या मागे येते दाम
अन् तो मिळवतो नाम

**– श्रीहरी गुणे**
**फोन नं. २४५३८३५३**

**VIDISHA ENTERPRISES**

Tally Partner

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob. :** +91-9970156307
**Tel. :** +91-20-27660748
**Email :** meghanathakur@yahoo.com

# जंगली महाराजांच्या १२५ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री. हळबे यांचे उपक्रम



श्री. अविनाश हळबे हे कवी, लेखक व व्याख्याते म्हणून सर्वांना सुपरिचित आहेतच. पुण्यातील श्री जंगलीमहाराज हे त्यांचे गुरुस्थान. यंदा (सन २०१५) हे वर्ष श्री जंगलीमहाराजांच्या १२५ व्या पुण्यतिथीचे असल्याने श्रीमहाराजांच्या सेवेसाठी काही विशेष उपक्रम करावा असे त्यांच्या मनात आले. त्याप्रमाणे त्यांनी दि. ३ व ४ मार्च रोजी श्रींचे समाधीसमोर बसून शास्त्रोक्त रीतीने श्रीगणपती अथर्वशीर्षाची ११२५ आवर्तने केली. यासाठी त्यांना एकूण २३ तास लागले. याबरोबरच दि. ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून पुण्यातील १२५ महिलांकरवी अथर्वशीर्ष (२१ आवर्तने) आणि श्रीसूक्त (१६ आवर्तने) पठण हा ही कार्यक्रम हळबे कुटुंबीयांनी मंदिरात आयोजला होता. प्रत्यक्षात १२५ ऐवजी १४० महिलांनी उत्सर्फूतपणे हे पठण केले!

या उपक्रमाची नोंद घेताना येथील श्री सुद्गुरू जंगलीमहाराज भजनीमंडळाने श्री हळबे यांचा शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन सत्कार केला.



**श्री सुद्गुरू जंगलीमहाराज भजनीमंडळाने श्री हळबे यांचा शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन सत्कार केला.**



**अथर्वशीर्ष पठण**



**महिलांचे स्तोत्रपठण**

# फुलला स्वरमोगरा...

**संस्थावृत्त**

'कऱ्हाडे ब्राह्मण संघ', पुणे तर्फे वासंतिक महोत्सवात दि. १८ एप्रिल रोजी डॉ. सौ. राजश्री महाजनी यांचा 'स्वरमोगरा' हा मिश्र गीतांचा कार्यक्रम श्रुती मंगल कार्यालयात सादर झाला. कार्यक्रमाची सुरुवात आधी गणाला, रणी आणला... या गीताने झाली. त्यानंतर, त्या सावळ्या तनूचे..., हृदयी प्रीत जाणता..., फुलले रे क्षण माझे..., केव्हातरी पहाटे..., मोगरा फुलला..., हे श्यामसुंदरा..., मन लागो फकीरी में..., मर्मबंधातली ठेव ही..., दासाची संपत्ती..., तिकीट मिळेना..., सत्य वदे वचनाला नाथा..., उघड्या पुन्हा जाहाल्या... इ. वैविध्यपूर्ण गीते तयारीने सादर झाली. कार्यक्रमाची सांगता अवघा रंग




एक झाला... या भैरवीतील गीताने झाली. डॉ. सौ. राजश्री महाजनी यांना प्रज्ञा देसाई (हार्मोनियम), सौ. उमा जटार (व्हायोलिन), यशोधन जटार (तबला) आणि जयंत अत्रे (तालवाद्ये) यांनी साथ केली. निवेदन सौ. चारुता प्रभुदेसाई यांनी केले. संघाचे अध्यक्ष गणेश गुर्जर, उपाध्यक्ष गोपाळ भाटवडेकर, लक्ष्मीकांत देसाई, दीपक भडकमकर इ. पदाधिकारी व संघाचे बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

# धर्मवीर डॉ. बालकृष्ण शिवराम मुंजे की जीवन गाथा (खण्ड - १ एवं २) (मूल लेखक - साहित्याचार्य बालशास्त्री हरदास (मराठी))

हिन्दी अनुवादक
डॉ. चन्द्रकांत विष्णु मोघे

धर्मवीर डॉ. बालकृष्ण शिवराम मुंजे (१८७२–१९४८) का जन्म अद्यपि बिलासपुर में हुआ था, किन्तु उनका कार्यक्षेत्र नागपुर (मध्यप्रान्त) था। अत्यंत विपरीत परिस्थितीयों का सामना करते हुए उन्होंने नेत्र चिकित्सक की पदवी प्राप्त की। काँग्रेस में रहते हुए उन्होंने बाल गंगाधर तिलक की विचार धारा का अनुसरण किया। उन्होंने तिलक जी को अपना राजनीतिक गुरू माना था। वे कट्टर हिन्दुत्ववादी थे। हिन्दू धर्म की कुरीतियों को मिटाने हेतु उन्होंने हिन्दू–धर्मशास्त्र का ग्रंथ लिखिने का प्रयास किया। धार्मिक एवं राजनीतिक चेतना को जागृत करने के लिये उन्होंने 'कीर्तन सम्प्रदाय' को पुनर्जीवित कर उनके सम्मेलन आयोजित किये । हिन्दूसभा की परिषदों में भी वे बढ चढ कर हिस्सा लेते रहे। नागपुर में हिन्दू सभा शाखा उन्होंने ही स्थापित की। सन १९१५ में अखिल भारतीय हिन्दूसभा महासभा की स्थापना हुई । इसके वे लम्बे समय तक अध्यक्ष रहे और स्वातंत्र्यवीर सावरकर जी के साथ इसके लिये तन, मन, धन से कार्य किया। तत्कालीन भारतीय सेना में अधिक से अधिक हिन्दू लोग भर्ती हो सकें, इसके लिये उन्होंने राजनीतिक स्तर पर पूरी ताकत से प्रयास किये। हिन्दू मानसिक और शारीरिक दृष्टि से सबल हो इसके लिये भी उन्होंने अथक प्रयास किये। इसीलिये उन्हें 'धर्मवीर' की उपाधि प्राप्त हुई। उनके प्रयासों से ही भारत में प्रथम सैनिक विद्यालय 'भोंसला मिलिटरी स्कूल' की स्थापना नासिक (महाराष्ट्र) में हुई। काँग्रेस में होने के बावजूद उन्होंने काँग्रेस की और महात्मा गांधी की मुस्लिम परस्त नीतियों का खुला विरोध किया । आज जिस 'घर वापसी' (पुनः धर्मान्तरण) की प्रक्रिया जोर पकड रही है, उसका आज से लगभग सौ वर्ष पूर्व ही डॉ. बालकृष्ण शिवराम मुंजे जी ने प्रारम्भ कर दिया था। तत्कालीन विपरीत राजनीतिक, सामाजिक, धार्मिक परिस्थितियों में उनका यह प्रयास निश्चित ही प्रशंसनीय था। तत्कालीन मध्यप्रान्त की राजनीति में वे अग्रणी नेता थे। उनके मार्गदर्शन में पले बढे कई युवा नेताओं में राष्ट्रीय स्वयं सेवक संघ के संस्थापक प. पू. डॉ. केशव बलिराम हेडगेवार जी का स्थान सर्वोच्च है।

जनवरी १९२० में डॉ. मुंजे जी के मित्र एवं सहयोगी डॉ. ल. वा. परांजपे और मुंजे जी के पुत्रवत डॉ. केशव बलिराम हेडगेवार जी जो प्रान्त के सार्वजनिक जीवन में प्रकाशवान हो रहे थे, के नेतृत्व में 'भारत स्वयं सेवक मंडल' की स्थापना की गई। (खण्ड – १ पृ. ४३१–४३२)

सन १९२० की नागपुर काँग्रेस का आयोजन डॉ. मुंजे जी द्वारा किया गया था। इसमें स्वागताध्यक्ष श्री जमनालाल बजाज थे और प. पू. डॉ. केशव बलिराम हेडगेवार जी को उनका सहायक बनाया गया था। साथ ही स्वास्थ विभाग में भी अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे के सहायक के रुप में भी उन्हें दायित्व दिया गया था। यह अधिवेशन अपनी भव्यता के कारण ऐतिहासिक रहा।

इसके पूर्व सन १९१९ में विश्व युद्ध के विजय समारोह की योजना अंग्रेज सरकार ने बनाई थी। इसका विरोध पूरे मध्यप्रान्त में हुआ। इसी समय नागपुर के राष्ट्रीय दल के कार्यकर्ताओं के युवा समूह ने 'नागपुर नॅशनल युनियन' नाम से उग्र विचारधारा की संस्था स्थापित की। प्रत्यक्ष्य क्रान्ति को असंभव जानकर जनजागृती के कार्य पर ध्यान केंद्रित करने वाली इस संस्था का नेतृत्व डॉ. हेडगेवार जी कर रहे थे। इस समूह ने सरकारी विजय दिवस को निषेध दिवस के रूप में मनाने हेतु जो पत्रक जारी किया था, उस पर डॉ. हेडगेवार जी के हस्ताक्षर थे। (पृष्ठ – ४२६, खण्ड –१)

'सरकारी दमन चक्र के चलते इस समय मध्यप्रान्त में विशेषकर नागपुर के क्रान्तिकारी युवाओं को डॉ. मुंजे जी ने हर प्रकार से सम्बल प्रदान किया।.... सन १९०९ में क्रान्तिकारी आंदोलन के कार्यकर्ता डॉ. केशव बलिराम हेडगेवार जी रिज्ले सर्क्युलर की चपेट में आये और उन्हें विद्यालय से निकाला गया तो डॉ. मुंजे जी ने उन्हें डॉ. नरहरि शिवराम परांजपे जी के राष्ट्रीय विद्यालय, यवतमाल भेजा। किन्तु सरकार द्वारा इसे भी बन्द कर दिया गया। नागपुर लौटने पर सन् १९१० में डॉ. मुंजे जी ने अपने परम मित्र दाजी साहब बुटी से आर्थिक सहयोग लेकर डॉ. केशव बलिराम हेडगेवार जी को क्रान्तिकारियों से प्रशिक्षण लेने हेतु, किन्तु दिखावे के लिये चिकित्सा अध्ययन हेतु, कलकत्ता भेजा। इस संबंध में डॉ. हेडगेवार जी के एक मित्र और क्रान्तिकारी नेता रामलाल बाजपेयी ने अपने आत्मचरित्र में लिखा है 'श्री. केशव राव हेडगेवार जी जो आर.एस.एस. के जनक है, को रा. दाजी साहब बुटी की सहायता से डॉक्टरी पढने की अपेक्षा पुर्लिन बिहारीदास के पास क्रांतिकार्य और संगठन के प्रशिक्षण प्राप्त करने हेतु भेजा।' हेडगेवार जी अपने साथ डॉ. मुंजे जी का पत्र साथ ले गये थे, जिससे वहां के अपरिचित वातावरण में उनकी सरलता पूर्वक व्यवस्था संभव हो सकी। (पृष्ठ – २९६, खण्ड –१ )

१९२० के नागपुर काँग्रेस अधिवेशन में डॉ. हेडगेवार जी स्वयं सेवक दल के प्रमुख थे।.... सम्मेलन की सफलता से उत्साहित होकर उन्होंने काँग्रेस स्वयं सेवकदल चलाने का प्रयास किया। उन्हें प्रशिक्षण दिया, शिबिर आयोजित किये पैसा खर्च किया। परन्तु उनके यह सारे प्रयास व्यर्थ हुए। १९२३ में नागपुर म ें हिन्दू महासभा स्थापित हुई। इसका मुख्य उद्देश्य था सभी लोग निश्चित समय पर एक स्थान पर एकत्रित होकर विचार विमर्श करें। इसी प्रकार के एकत्रिकरण के द्वारा समान विचारधारा के मित्रों से विचार विनिमय कर अपनी कल्पनाओं को डॉ. हेडगेवार जी ने मूर्तस्वरूप प्रदान किया। उन्होंने जिस कल्पना को साकार किया वह थी 'राष्ट्रीय स्वयं सेवक संघ'।..... इसके माध्यम से

पान क्र.१६ वर

*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

## धर्मवीर डॉ. बालकृष्ण शिवराम मुंजे की जीवन गाथा (खण्ड - १ एवं २)

**पान क्र.१५ वरून** उन्होंने नवयुवको में क्षात्रवृत्ति को स्थापित एवं विकसित करने का लक्ष्य निर्धारित किया।.... हिन्दू संस्कृति की रक्षा करना ही संघ का मुख्य उद्देश्य था।... संघ के रूप में उन्होंने समान विचारधारा के राष्ट्र को जीवन अर्पण करने वाले सहस्त्रावधि कार्यकर्ताओं के निर्माण का बीडा उठाया।.... एक और महत्वपूर्ण बात संघ के संबंध यह थी कि राष्ट्रीय स्वयं सेवक संघ को उन्होंने राजनीति से बिलकुल अलग और दलीय संघर्ष से दूर रखा। इस प्रकार राष्ट्रीय स्वयं सेवक संघ को उन्होंने राष्ट्रीय विचारधारा से ओतप्रोत एक सांस्कृतिक संगठन के रूप में स्थापित और विकसित किया। राष्ट्रीय स्वयं सेवक संघ को डॉ. मुंजे जी का पूर्ण समर्थन था। (पृष्ठ – १९१–१९२, खण्ड –२)

'डॉ. केशव बलिराम हेडगेवार अंग्रेजी शासन में महाराष्ट्र में विकसित राष्ट्रीय ध्येयवादी और निष्ठावान पिढ़ी के प्रतिनिधि थे।... अखण्ड कर्मयोग उनकी विशेषता थी। इसी के माध्यम से उन्होंने... राष्ट्रीय स्वयं सेवक संघ को भारत व्यापी संस्था बनाया। उनकी तपस्या के फलस्वरुप देश का पावित्र्य अक्षुण्ण बना हुआ है।' (पृष्ठ १९२–१९३ खण्ड –२)

प्रकाशक – सेंट्रल हिन्दू मिलिटरी एज्यूकेशन सोसायटी, नासिक (महाराष्ट्र)



# सातारी पेढा शॉप

संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६



**मशहूर**
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

**चटकदार**
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

**पौष्टीक खाद्य भांडार**

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

# पत्र प्रतिसाद

*स. न.*

*'संपर्क' एप्रिल - जून २०१५ हा अंक सर्वार्थाने सुंदर उल्लेखनीय आहे. आपल्या अध्यक्षतेखाली कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे हा यशाची शिखरे पादाक्रांत करत आहे हे पाहून आनंद व समाधान वाटले. अंकाची बाह्यरचना, छपाई, जाहिरातीची रचना, छपाई ही उल्लेखनीय आहे.*

*विशेषतः प्रकाश होम इंडस्ट्रीज बेळगावची जाहिरात वाचून माझ्या कारखान्यात १९७२ चे सुमारास घेतलेले रेडीयल ड्रिलिंग मशिनची आठवण आली. माझ्या सर्व मशिन शॉपमध्ये ते एकमेव मशिन ३०/४० वर्षे चालले. त्याचप्रमाणे कऱ्हाडे ब्राह्मणांमध्ये पुष्कळ कर्तृत्ववान तरुण आहेत, त्याची माहिती 'तरुण तंत्रज्ञ' या शीर्षकाखाली दिल्यास त्यांचे विक्रीला मदत होईल. मधून मधून पुरवणी एखाद्या विषयाची / जिल्ह्याची माहिती दिल्यास क. ब्राह्मण तरुणांना वाव मिळू शकेल.*

*मनःपूर्वक अभिनंदन.* *कळावे,*

*आपला स्नेहांकित,*

***- मनोहर जांभेकर***

***मो. ९३७१०४१५८०***

*स. न. वि. वि.*

*'संपर्क'चा एप्रिल-जूनचा वासंतिक अंक, काव्यशास्त्र, विनोद, प्रवासवर्णन यांनी परिपूर्ण आहे. आनंद यात्रेमुळे विदर्भाचा मागासभाग आणि आमटे परिवाराचे काम यांची ओळख होते. टपाल तिकिटे दाखविल्यामुळे आपल्या समाजातील थोर विभूतींची सरकारी दखल पाहायला मिळून त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित होतो.*

***- य. वि. हर्डीकर***

***मो. नं. ९३७३५९९०८४***

# पाककृती

सौजन्य – मधुमित्र

## १. मोडाच्या मुगाचे सॅलड (२ व्यक्तींसाठी)



**साहित्य :** वाफवलेले मुगाचे मोड १ वाटी, जाड पोहे अर्धी वाटी, मध्यम चिरलेली काकडी अर्धी वाटी, बारीक चिरलेला टोमॅटो अर्धी वाटी, बारीक चिरलेली कोथिंबीर २ टेबलस्पून, भिजवलेले शेंगदाणे १ टेबलस्पून, खाराची मिरची लोणचे अर्धा टेबलस्पून, मीठ, साखर, लिंबाचा रस चवीनुसार.

**कृती :** वरील सर्व गोष्टी दिलेल्या प्रमाणानुसार एकत्र करून घ्या. त्यामध्ये चवीनुसार मीठ, साखर, लिंबूरस टाका. वर कोथिंबीर टाकून प्लेटमधून सर्व्ह करा. खाराची मिरची टाकल्यावर स्वाद उत्तम. मधल्या वेळी खाण्यासाठी याचा उपयोग करता येईल. करण्यास सोपी आणि आरोग्यास अतिशय उपयुक्त आहे.

## २. राजमा टिक्के – (३ व्यक्तींसाठी)



